Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# सावित्रीबाई फुले - महिला शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या प्रणेत्या

**प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे,** मराठी विभाग प्रमुख, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

## सारांश

हा शोधनिबंध आधुनिक भारतीय समाजाला आकार देण्यामध्ये, विशेषतः शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करतो. त्यांच्या योगदानाने भावी पिढ्यांच्या महिला आणि सुधारकांसाठी पाया कसा रचला, ज्यामुळे त्यांना भारतातील सर्वात महत्त्वाच्या सामाजिक सुधारकांपैकी एक म्हणून स्थान मिळाले यावर हा निबंध भर देणारा आहे.

सावित्रीबाई फुले (१८३१-१८९७) या भारतातील सामाजिक सुधारणांच्या इतिहासातील एक अग्रणी स्त्री सुधारक मानल्या जातात. महिलाचे शिक्षण, बालविवाहविरोधातील कार्य आणि जातिव्यवस्थेविरुद्धच्या लढाईतील योगदानासाठी त्या प्रसिद्ध आहेत. मुलींच्या शिक्षणाचे काम हाती घेणाऱ्या भारतातील पहिल्या महिलांपैकी एक म्हणून, फुले दांपत्याकडे पाहीले जाते. सावित्रीबाईंनी समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि स्त्री शिक्षण यात क्रांती घडवून आणली. या शोधनिबंधात त्यांचे जीवन, शिक्षण आणि सामाजिक सुधारणांमधील त्यांचे योगदान आणि भारतीय समाजावर त्यांच्या कार्याचा कायमस्वरूपी परिणाम यांचा आढावा घेण्यात आला आहे.

## प्रस्तावना

प्रथम व दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम म्हणून युरोपियन देशांमध्ये स्त्रिया कामासाठी घराबाहेर पडल्या आणि तिथून त्यांच्या कर्तृत्वासाठी विविध क्षेत्रे उपलब्ध झाली. युरोपियन स्त्रीवादाचा प्रभाव जगभरामध्ये पडला आणि त्यातून स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांचा सामाजिक आर्थिक व राजकीय दर्जा याविषयी चर्चा व्हायला सुरुवात झाली. सीमॉन द बोव्हारने (१९०८-८६) लिहिलेल्या ल दझिॲम सॅक्स (१९४९) (द सेकंड सेक्स,१९५३) या ग्रंथापासून स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रारंभ झाला, असे मानले जाते. युरोपमध्ये या सर्वांचा प्रभाव साहित्यावर मोठ्या प्रमाणावर उमटला आणि त्यातून स्त्रीवादाची एक वेगळी शाखा साहित्य क्षेत्रात विकसित झाली. युरोपमध्ये पुरुषी वर्चस्व असलेल्या सांस्कृतिक वातावरणाला छेद देणारी स्त्रीवादी विचार परंपरा अतिशय तिखट आणि आक्रमक स्वरूपाची असली तरीही भारतासारख्या देशांमध्ये तिचे स्वरूप सौम्य, मवाळ आणि काही क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले दिसून येते. भारतीय स्त्रियांचे प्रश्न अमेरिकन किंवा युरोपियन पद्धतीचे नव्हते आणि युद्धाच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांची जाणीव जागृती देखील भारतामध्ये झालेली नाही. त्यामुळे भारतामध्ये स्त्रियांचे हक्क, त्यांचे अधिकार याविषयी एका वेगळया पद्धतीचे जागरूकता निर्माण झाली. ही पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यांचा आढावा घेणे अतिशय आवश्यक आहे.

१८३१ मध्ये महाराष्ट्रात जन्मलेल्या सावित्रीबाई फुले यांचे विचार काळाच्या पुढे होते. ज्या काळात सामाजिक रचना पितृसत्ताक आणि जाती-आधारित भेदभावाने खोलवर रुजलेली होती, त्या काळात सावित्रीबाई फुले यांची कृती आणि विचार क्रांतिकारी होते. त्यांनी महिला आणि समाजातील उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी अथक परिश्रम घेतले. भारतातील मुलींसाठी पहिली शाळा स्थापन करण्यात आणि


Copyright © | JET Network, All Rights Reserved

सामाजिक सुधारणा चळवळीच्या प्रगतीत त्यांचे पती ज्योतिराव फुले यांच्याशी असलेली त्यांची भागीदारी महत्त्वाची ठरली.

**पार्श्वभूमी आणि सुरुवातीचे जीवन**

सावित्रीबाईंचा जन्म माळी कुटुंबात झाला होता, जो समाज स्वतः सामाजिक भेदभावाला बळी पडलेला होता. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचे लग्न ज्योतिराव फुले यांच्याशी झाले, जे एक प्रगतीशील विचारवंत आणि समाजसुधारक होते. ज्योतिरावांनी सावित्रीबाईंची क्षमता ओळखली आणि त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले, जे महिलांसाठी, विशेषतः निम्न-जातीय पार्श्वभूमीतील महिलांसाठी क्रांतिकारक पाऊल होते. त्यांनी त्यांच्या पतीच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतले, त्यामुळे त्या शिक्षण घेणाऱ्या भारतातील निवडक महिलांपैकी एक बनल्या.

**महिला शिक्षणात योगदान**

सावित्रीबाई फुले यांचे सर्वात महत्त्वाचे योगदान शिक्षण क्षेत्रात होते. पुण्यामध्ये त्यांनी आणि त्यांचे पती ज्योतिराव फुले यांनी पुण्यात मुलींसाठी शाळा स्थापन केली. ज्यामुळे महिलांना अशिक्षित ठेवणाऱ्या तत्कालीन नियमांना आव्हान दिले गेले. ज्या काळात मुलींना शाळेत जाण्याची परवानगी नव्हती, त्या काळात सावित्रीबाईंनी धाडसाने मुलींना शिकवले. त्यामुळे मुलींसाठी औपचारिक शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले. तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये बहुतांश मुलींची लग्ने लहानपणीच केली जात असत. ज्या मुलींची लग्ने झालेली नसते, त्या घरामध्ये राहत असत. सावित्रीबाई फुले यांनी घरोघरी जाऊन अशा मुलींच्या पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. आग्रहाने, विनंतीने आणि प्रबोधनाचा मार्ग स्वीकारत त्यांनी पालका शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या प्रक्रियेदरम्यान त्यांना अनेक वेळा तीव्र विरोधाचा सामना सहन करावा लागला. तत्कालीन सामाजिक नियमानुसार घरातील मुली व महिलांनी घराचा उंबरठा ओलांडणे असंस्कृत मानले जात असे. सुसंस्कृतपणाच्या सीमारेषा घराच्या उंबरठ्यापर्यंत मर्यादित असल्यामुळे मुलींनी एखाद्या शाळेत जावे आणि तिथे शिक्षण घ्यावे, ही कल्पना बहुतांश पालकांना मान्य होत नव्हती. स्त्री शिक्षणाला विरोध करणाऱ्या अनेक विचारधारा त्या काळामध्ये समाजामध्ये काम करत असल्यामुळे त्यांच्याकडून सावित्रीबाई फुले यांना विरोध केला गेलेला दिसूतो.

सावित्रीबाई फुले यांच्या शाळेत शिकवला जाणारा अभ्यासक्रम आधुनिक विचारांशी अनुकूल होता. त्यात केवळ पारंपारिक विषयांचा समावेश नव्हता तर मुलींच्या सक्षमीकरणावरही भर होता. मुलींना स्वतंत्र आणि स्वावलंबी होण्यासाठी आवश्यक असणारे विषय शिकवले जात असत. शाळेमध्ये शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देखील दिले जात असे. सावित्रीबाई फुले यांच्या शाळेमध्ये पहिल्यांदा स्त्रियांनी अर्थार्जण करणे गरजेचे आहे, ही भूमिका स्वीकारली होती. याचा फायदा पुढील काळात सावित्रीबाई फुले यांनी विधवा, परित्यक्ता आणि घर सोडून पळून आलेल्या स्त्रियांच्या आश्रमातील शिक्षणासाठी झाला. अनेक स्त्रिया घरगुती जाचाला कंटाळून किंवा विधवा असल्यामुळे आत्महत्या करण्यास प्रवृत्त व्हायच्या. अशा आत्महत्या करायला जाणाऱ्या स्त्रियांना वाचवण्याचे काम महात्मा फुले व त्यांचे सहकारी करत असत. अशा स्त्रिया आश्रमामध्ये राहून स्वतःच्या उपजीविकेची नवीन साधने समजावून सांगितली जात असत. त्यांना त्यांची उपजीविका चालवण्यासाठी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे गरजेचे आहे, हे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना महत्त्वाचे वाटत असल्यामुळे व्यावसायिक प्रशिक्षणाचे प्रारंभिक स्वरूप सावित्रीबाई


Copyright © | JET Network, All Rights Reserved

फुले व महात्मा फुले यांनी त्यांच्या काळात विकसित केलेले दिसून येते. ज्यामुळे मुलींना उत्पादक जीवन जगण्यास मदत होईल अशी कौशल्ये शिकता आली.

**महिला हक्कांसाठी सामाजिक सुधारणा आणि लेखन**

सावित्रीबाई या एक प्रतिभासंपन्न कवयित्री होत्या. १९८८ मध्ये अभ्यासक डॉ. मा. गो. माळी यांनी 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय' या ग्रंथाद्वारे त्यांच्या कविता प्रकाशात आल्या. मराठी विश्वकोशानुसार "सावित्रीबाईंच्या 'काव्यफुले' (१८५४) या काव्यसंग्रहात एकूण ४१ कविता आहेत. त्या स्थूलमानाने निसर्गविषयक, सामाजिक, आत्मपर, बोधपर आणि इतिहासविषयक अशा आहेत. सावित्रीबाईंच्या साहित्यावर जोतीरावांच्या विचारांचा निश्चितपणे प्रभाव होता; मात्र त्यांचे लिखाण ही एक स्वतंत्र अभिव्यक्ती आहे. त्यांच्या काव्यातून जोतीरावांविषयीचा आदरभाव; स्त्री-पुरुष नात्यातला समताभाव; निसर्गसौंदर्य पाहून पुलकित होणारे, उचंबळणारे स्त्रीमन अतिशय तरलपणे व्यक्त झाले आहे. तसेच भारतीय खेड्यांमधील कृषक संस्कृतीचे मनोहारी चित्रण, निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि त्यांबद्दलचा कृतज्ञताभाव या कवितांमधून त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच या कवितांमधून स्त्री-पुरुष नात्यातील उतरंड, शोषक लिंगभावसंबंध, पुरुषाची भ्रमरवृत्ती यांविषयी स्त्रीमनाचे हुंकार व्यक्त झाले आहेत. त्यांचा मूळ पिंड समाजसुधारणावादी होता. ज्ञानाची महती, शिक्षणाचे महत्त्व, मनुष्यत्वाचे सार अशा विषयांना वाहिलेल्या कविता त्यांनी प्राधान्याने लिहिल्या. 'स्वागतपर पद्य' हे स्वागतगीत किंवा बाहुलीसारख्या विषयावरील कविता त्यांनी शाळेतील विद्यार्थिनींसाठी रचल्या असाव्यात. लहान मुलींना घरकामाला न जुंपता त्यांना शाळेत पाठवले पाहिजे, हा विचार त्यांनी अधोरेखित केला. ग्रामीण भागातील स्त्रीशिक्षणाविषयीची उदासीनता पाहता हा विचार आजही किती लागू पडतो, हे लक्षात घेण्याजोगे आहे."

"सावित्रीबाईंचा दुसरा कवितासंग्रह 'बावनकशी सुबोध रत्नाकर' (१८९२) म्हणजे जोतीरावांचे काव्यमय असे आद्यचरित्रच होय. तसेच भारतातील शूद्रातिशूद्रांना केंद्रस्थानी ठेवून लिहिलेला त्यांच्या मुक्तीचा हा पहिला काव्यमय इतिहास आहे. या कवितासंग्रहामध्ये वैदिक काळ ते इंग्रजी राजवट आणि फुलेंची चळवळ असा भारतीय इतिहासाचा मोठा पट सावित्रीबाईंनी मांडला आहे. सावित्रीबाईंनी आपल्या काव्यातून अभिजन, ब्राह्मणी, वैदिक परंपरेविरुद्ध विद्रोह उभारला आणि गौतम बुद्ध, बळी राजा, छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी ताराबाई यांचे आदर्श उभे करत त्यांनी अवैदिक परंपरेशी नाते जोडले. यातील ताराबाईंवरील पोवाडा हा एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीवर रचलेला पोवाडा म्हणून महत्त्वाचा आहे. तसेच एखाद्या स्त्रीने शिवाजी महाराजविषयक रचलेली कविता म्हणूनही ती लक्षणीय आहे."

"एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात धर्मकल्पना, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा यांनी येथील बहुजनांना मानसिक गुलामगिरीत जखडले होते. त्यांविरुद्धचा विद्रोह सावित्रीबाईंच्या लेखणीतून व्यक्त होतो. अभंगासारखे लोकाभिमुख काव्यप्रकार त्यांनी हाताळले. १८५६ साली जोतीरावांची भाषणे प्रकाशित केली. यांखेरीज सावित्रीबाईंनी जोतीरावांना लिहिलेली पत्रे आणि त्यांची भाषणेही प्रकाशित झाली आहेत. त्यातून उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसने व कर्ज यांसारखे विषय त्यांनी हाताळले असून खटकणाऱ्या गोष्टींचा खरमरीत शब्दांत समाचारही घेतला आहे. दारू, जुगार व वेश्यागमन या तीन गोष्टी पुरुषाला दुराचारी बनवतात आणि म्हणून त्यांपासून पुरुषांनी लांब राहिले पाहिजे, अशी पुरुषवर्गाची कानउघडणी त्यांनी केली


Copyright © | JET Network, All Rights Reserved

आहे. लोकशिक्षणासाठी गोष्टी-वेल्हाळ शैलीचा उपयोग अधिक परिणामकारक आहे, हे ओळखून उदाहरणे देत उद्योग, सदाचरण व विद्यादान यांचे महत्त्व त्यांनी पटवून दिले आहे."

सावित्रीबाई फुले महिला आणि उपेक्षित समुदायांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या सुधारणावादी होत्या. त्यांनी प्रत्यक्ष आणि साहित्याच्या रे बालविवाहाच्या प्रथेविरुद्ध आणि विधवांच्या अत्याचाराविरुद्ध लढा दिला. त्यांनी जातिव्यवस्थेविरुद्धही आवाज उठवला, ज्याला त्या विविध जातींच्या सामाजिक समानतेत एक मोठा अडथळा मानत होत्या. म. फुले यांनी त्यांच्या लेखन आणि भाषणांद्वारे महिला आणि विविध जातीच्या लोकांना कनिष्ठ दर्जा देणाऱ्या भेदभावपूर्ण प्रथांचा निषेध केला होता, त्यांचा प्रभाव सावित्रीबाई फुले यांच्यावर दिसून येतो. सावित्रीबाई फुले यांनी १८७३ मध्ये त्यांच्या पतीसह सत्यशोधक समाजा (सत्य शोधक समाज) ची स्थापना करण्यातही योगदान दिले. समाजाचे उद्दिष्ट तत्कालीन खालच्या जाती आणि महिलांना शिक्षित करणे आणि सक्षम करणे हे होते. जाती व्यवस्थेच्या पारंपारिक पद्धती आणि अस्पृश्यतेला आव्हान त्यांनी दिले. भविष्यात सामाजिक समानता आणि न्यायाबद्दल जागरूकता पसरवण्यात या संघटनेने महत्त्वाची भूमिका बजावली. पुण्यातील हडपसर येथे प्लेगग्रस्तांची सेवा करतांना त्यांना स्वतःच हा आजार झाला. १० मार्च १८९७ रोजी सावित्रीबाई फुले यांचा मृत्यू झाला.

**वारसा आणि परिणाम**

सावित्रीबाई फुले यांचे योगदान आजही प्रेरणास्रोत आहे. शिक्षिका आणि समाजसुधारक म्हणून त्यांच्या भूमिकेने भावी पिढ्यांच्या महिलांना पुढे जाण्यासाठी आणि समाजात त्यांचे स्थान मिळविण्यासाठी पाया घातला. जाती-आधारित भेदभाव, बालविवाह आणि लिंग असमानतेविरुद्धच्या त्यांच्या अथक लढाईमुळे भारतात सामाजिक सुधारणा चळवळींची एक नवीन लाट निर्माण झाली. त्यांना अनेक अडचणी आणि वैयक्तिक नुकसान सहन करावे लागले असले तरी, त्या एक चांगला समाज निर्माण करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेवर ठाम राहिल्या. मराठी विश्वकोशानुसार "सावित्रीबाईंच्या खंबीर नेतृत्वानंतर सत्यशोधक चळवळीची परंपरा सत्यशोधक विचारांचा संस्कार झालेल्या अनेक स्त्रियांनी पुढे नेली. तान्हुबाई बिर्जे (१८७६–१९१३) यांनी 'दीनबंधू' या नियतकालिकाच्या संपादक म्हणून काही वर्षे काम पाहिले. सावित्रीबाई रोडे (कार. १८९०–१९३०) या रामोशी समाजातील महिलेने 'रामोशी समाचार' या नियतकालिकातून दलितांच्या व्यथा मांडल्या. १९२५ साली विदर्भातील वर्धा येथे लक्ष्मीबाई नायडू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्यशोधक महिला परिषदेला पाच हजार महिला हजर होत्या.

शांताबाई बनकर यांनी १९३९ मध्ये सावित्रीबाईंचे छोटे चरित्र लिहिले. सावित्रीबाईंवर आजवर जवळपास ४० छोटीमोठी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या काही कवितांचा इंग्रजीत अनुवादही झाला आहे. सुषमा देशपांडे यांनी 'व्हय मी सावित्रीबाई' या मराठी एकपात्री नाटकाचे प्रयोग भारतभर केले आहेत. सावित्रीबाईंच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन 'बालिकादिन' म्हणून साजरा केला जातो. सावित्रीबाईंच्या कार्याचे क्रांतिकारी स्वरूप लक्षात घेऊन त्यांना 'क्रांतिज्योती' ही उपाधी दिली गेली. तसेच ९ ऑगस्ट २०१४ या दिवशी पुणे विद्यापीठाचे नामकरण 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असे करण्यात आले. १४ फेब्रुवारी २०२२ या दिवशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला."


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रभाव आधुनिक भारतातील शैक्षणिक धोरणांमध्ये दिसून येतो, विशेषतः मुली आणि उपेक्षित समुदायांसाठी शिक्षणाच्या प्रचाराबाबत. महिलांच्या उत्थानासाठी फुले कुटुंबाच्या प्रयत्नांनी संपूर्ण भारतात असंख्य सामाजिक सुधारणा चळवळींना प्रेरणा दिली आहे.

## निष्कर्ष

सावित्रीबाई फुले एक दूरदर्शी होत्या ज्यांनी व्यक्ती आणि संपूर्ण समाजाचे जीवन बदलण्यात शिक्षणाच्या परिवर्तनकारी शक्तीला ओळखले. महिला शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि सामाजिक समानतेसाठी वकिली करण्याच्या त्यांच्या अग्रगण्य कार्यामुळे त्यांना भारताच्या सामाजिक सुधारणांच्या इतिहासात एक मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व बनवले आहे. शिक्षिका, समाजसुधारक आणि महिला आणि शोषितांच्या हक्कांसाठी समर्थक म्हणून, सावित्रीबाई फुले यांचा वारसा सामाजिक न्याय चळवळींना, विशेषतः लिंग समानता आणि शिक्षणासाठी वकिली करणाऱ्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणा देत आहे.

## संदर्भ

१. फुले, ज्योतिराव, गुलामगिरी १८७३.
२. डांगळे, नंदिनी. "सावित्रीबाई फुले: एक स्त्रीवादी पायोनियर." इंडियन जर्नल ऑफ सोशल रिफॉर्म, १९९०.
३. जोग, शुभांगी. "सावित्रीबाई फुले यांचे जीवन आणि वारसा." महाराष्ट्र इतिहास पुनरावलोकन, २००१.
४. राजन, के.के. "भारतीय शिक्षणात सावित्रीबाई फुले यांचे योगदान." जर्नल ऑफ हिस्टॉरिकल एज्युकेशन, १९९५.


Copyright © | JET Network, All Rights Reserved